# फिरुन गावाकडे...

चित्रातल्या गावाचं स्वप्न पहाणारा संतोष गवळे यांची ही गोष्ट. मन्याळी हे उमरखेड तालुक्यातलं 700 ते 800 लोकसंख्या असलेलं असं चिमुकलं गाव. संतोषचं चवथीपर्यंतचं शिक्षण मन्याळीत, तर त्यानंतर मन्याळीपासून 2 किमी अंतरावर असलेल्या बिटरगावमध्ये बारावीपर्यंतचं शिक्षण झालं. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची.. शिकत असतानाच गुरांना चारायला ने, दूध टाकायला जा अशी अनेक कामं करावी लागत. कित्येक वेळा आई-वडिलांनी 'बस झालं शिक्षण' म्हणून शाळेत जाणं बंद केलं...पण गावातले शिक्षक आणि इतर चार जाणते लोक घरी येऊन समजावून सांगत. त्यामुळे संतोषचं उमरखेड इथे बीएपर्यंतचं शिक्षण झालं' तिथून नांदेडला त्याने एका खाजगी अपंगांच्या शिक्षणसंस्थेत शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली.

इथूनच खरं तर संतोषच्या सामाजिक जाणिवेची मूळं खोलवर रुजायला सुरुवात झाली असं म्हणता येईल्. दीड हजार पगार हातावर टाकून आठ हजारावर सही घेण्याच्या विरोधात संतोष उभा राहिला. त्याचे इतर सहकारीही त्याच्यासोबत ठामपणे उभे राहिले. मग संस्थेविरुध्द नव्हे तर या होणा-या अन्यायाविरुध्द आंदोलन सुरु झालं. संस्थेनंही संतोषवर अनेक खोटया-नाटया तक्रारी दाखल केल्या. पण न डगमगता संतोष लढत राहिला.

नांदेडला असतानाच संतोषनं पत्रकारितेचा कोर्स पूर्ण केला. मात्र या शिक्षणातून त्याला अधुरेपणाची जाणीव होऊ लागली. आपल्याला आणखी काही तरी हवंय या अस्वस्थतेतून तो पुण्यात आला. पुण्यात जाण्यासाठी मित्र-मैत्रिंणींनी तिकिटापुरते पैसे जमवून त्याला मदत केली. पुण्यात पत्रकारितेच्या मास्टर डिग्रीसाठी प्रवेश परीक्षा दिली. ती पास होउन त्याला पुणे विद्यापीठात प्रवेश मिळाला मग 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत 1500 रुपये दर महिन्याला मिळू लागले. काटकसरीत आपला खर्च भागवून संतोषने पत्रकारितेची मास्टर ड्रिग्री पूर्ण केली.

उमरखेडला असताना एनएसएसच्या कामातून अनेक सामाजिक प्रश्नांची जाणीव झाली होती. कॉलेजमध्ये असताना अनेक प्रश्न हातीही घेतले होते. अभ्यासात लक्ष कमी आणि इतर प्रश्नात जास्त असंच सगळं होतं. पुण्यात आल्यावर असीम सरोदेची भेट झाली. तिथेच अमीत राउत नावाचा एक मित्र मिळाला आणि त्या दोघांकडून डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांनी सुरु केलेल्या 'निर्माण' उपक्रमाची माहिती मिळाली. निर्माणविषयी कुतूहल जागं झालं. अनेक प्रश्न विचारुन संतोष

अमीत राउतला भंडावून सोडत असे. अखेर एक दिवस निर्माणचा अर्ज भरुन संतोषने निर्माण काय आहे हे समजून घेण्यास सुरुवात केली. निर्माणमध्ये आल्यावर संतोषसाठी एक वेगळं जग खुलं झालं. इथे एमटेक, डॉक्टर, इंजिनियर, वकील, आर्किटैक्ट, एमएसडब्लू अनेक विषयात शिक्षण घेणारी मुलं-मुली होती. त्यांचं अफाट वाचन, चर्चा आणि डॉ. अभय बंग आणि डॉ राणी बंगसहित अनेक तज्ज्ञाचं मार्गदर्शन....यामुळे संतोषच्या जाणिवा विकसित होण्यास मदत होऊ लागली. लहानपणापासून स्वप्नात पाहिलेलं सुंदर गावाचं स्वप्न आता खरं होईल असं संतोषला वाटू लागलं. ‘स्वप्नं खरी होऊ शकतात' हा विश्वास निर्माणने संतोषला दिला.




निर्माणची एक वर्षाची फेलोशिप संतोषला मिळाली. युनिक फिचर्सचे आनंद अवधानी आणि सुहास कुलकर्णी हे मार्ग्दर्शक म्हणून साथ करायला होतेच. त्यातून एखाद्या गावचे प्रश्न सोडवण्यासाठी कळीचा प्रश्न कोणता हे शोधायला हवं,

त्यासाठी पाणी प्रश्न किती महत्वाचा आहे आणि तोच सुटला तर गावचा आर्थिक प्रश्न कसा सुटतो याचा संतोषने अभ्यास सुरु केला. महाराष्ट्रातल्या अनेक गावात वर्षभर फिरुन पाणी प्रश्न समजून घ्यायला सुरुवात केली.. या फिरण्याने अनुभव मिळाला. अनुभवातून मिळालेल्या शिक्षणाचं महत्व संतोषला कळालं. अभ्यास करताना गावाची भौगोलिक स्थिती, लोक एकत्र येण्यासाठी काय करायला हवं, कोणत्या क्लुप्त्या वापराव्या लागतात हे सगळा अभ्यासक्रमातल्या शिक्षणापेक्षाही कितीतरी वेगळं शिक्षण प्रत्यक्ष फिल्डवर संतोषचं झालं.

एक वर्षाच्या कामानंतर पुण्यासारख्या शहरात रहाण्याचा मोह होताच, मुंबईची वाट खुणावत होती. पण आपलं गाव सुंदर करायचं स्वप्न त्यापेक्षा जास्त प्रखर आणि ठामपणे संतोषचं बोट पकडून उभं होतं. गावातले लोक आता शिकलेल्या संतोषला स्वीकारतील का ? याला शहरात काही कामाचं जमलं नाही म्हणून आला बोंबलत परत असं तर ते म्हणणार नाहीत ना ? हातात तर एक पैसाही नाही मग करायचं कसं सगळं ? असे प्रश्न होतेच. पण या प्रश्नांना उत्तरं होती, या वाटचालीत भेटलेल्या अनुभवांत, भेटलेल्या अनेक धडपडणा-या लोकांत. निर्माण पक्रियेत मिळालेला विश्वास आणि आधार घेऊन संतोष गावाकडे परतला.

गावात परतल्यावर संतोषने गावाचा सर्व्हे करायला घेतला. गावातले शिक्षक, अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने प्रत्यक्ष गावातले अनेक प्रश्न आणि गावाची माहिती या सर्वेक्षणाने मिळाली. यातूनच दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात आल्या. एक म्हणजे गावात शौचालयं नाहीत. त्यामुळे आजाराचं प्रमाण खूप मोठया प्रमाणात आहे. दुसरं म्हणजे स्वतःचं उत्पन्न नसतानाही लग्नासारख्या विधींवर अवास्तव खर्च कर्ज काढून केला जातो.

संतोषने सरकारी योजना समजून घेतल्या. तालुक्यातल्या अधिका-यांच्या भेटी घेतल्या. शहरात न रहाता गावात येऊन गावासाठी काही करु पहाणारा धडपडणारा तरुण म्हणून अधिका-यांनाही संतोषचं कौतुक वाटू लागलं. संतोषने शौचालयासाठी लोकसहभागाने चाळीस खडडे खोदले. जिल्हापरिषदेच्या मदतीने गंवडी प्रशिक्षणाची तजविज केली. लोकांनी श्रमदान करावं आणि त्यांना शौचालयाचं महत्व् पटावं म्हणून सातत्यानं बैठका घ्यायला सुरुवात केली. 'आधी केलें मग सांगितले' प्रमाणे स्वतः आधी शौचालय बांधलं. गावात गेल्यावर त्याने काही अटी सुरुवातीलाच घातल्या. 'आपण कोणाच्याही मदतीला धावून जाऊ पण त्याने शौचालय बांधलेलं असेल तर, किंवा घरपटटी भरली असली तर,

किंवा त्या घरातली व्यक्ती निव्यर्सनी असायला हवी. किंवा घरातली महिला बचतगटात असायलाच हवी.'

गावात प्रथम युवांचा गट एकत्र करुन व्हॉलीबॉलसाठी मैदान तयार करण्यात आलं. युवांना सोबत घ्यावं असा त्यामागचा दृष्टिकोन होता. पण जवळपास बहुतांशी मुलं व्यसनी होती. त्यांचे नकारात्मक विचार फार पक्के होत चालले होते. एक प्रकारची निष्क्रियता त्यांच्या जगण्यात आलेली जाणवत होती. विचार बदलण्यासाठी उपदेशापेक्षा वाचनालय असायला हवं हे संतोषच्या लक्षात आलं आणि 700 पुस्तकं बघता बघता जमा झाली. चार वर्तमानपत्रंही संतोषने या वाचनालयासाठी सुरु केली. वाचनालयानं आकार घेतला लोक वाचू लागले. पण अजून युवांना एकत्र करणं तितकं सोपं नाही हेही संतोषच्या लक्षात आलं.

मग संतोष महिलाशक्तीकडे वळला. बचतगटाच्या महिलांचा सपोर्ट घेतला पाहिजे असं लक्षात आलं. महिलांचे आपसातले मतभेद मिटवण्यात त्यानं पुढाकार घेतला. महिलांच्या अनेक बैठकी घेतल्या. माविमच्या संयोगिनींची मदत घेऊन आठवडयातून जवळपास दोन बैठका घेतल्या. महिला बदल चटकन स्वीकारतात हे संतोषच्या लक्षात आलं. इतरत्र काय चाललंय या माहितीने महिलांमध्ये कुतूहल वाढू लागलं. बैठकांना महिलांची संख्या वाढू लागली. त्यातून गावातल्या स्वस्त धान्य दुकानातून गावातल्या प्रत्येकाला त्याचया हक्काचं धान्य किंवा रॉकेल मिळत नसल्याचं संतोषच्या लक्षात आलं. मग या प्रश्नाचा पाठपुरावा करणं सुरु झालं. गावातल्या लोकांची यादी करुन बीपीएल, एपीएल, कोणाला किती धान्य मिळतं ही माहिती लक्षात आली. मग बचतगटाच्या महिलांमार्फत पैसे जमवले, तहसिलमध्ये महिलांनी स्वतः जाऊन चलन काढलं, आणि स्वतःच बँकेत पैसे भरायचे असं काम केल्यामुळे स्वस्त धान्य दुकानदाराचं महत्व आणि अरेरावीच संपुष्टात आली. परिणामी दुकानदार चिडला. त्याने लोकांना फितवण्याचा प्रयत्न सुरु केला. तहसिलदारांकडे संतोषच्या विरोधात तक्रार केली. पण संतोषने गावात येताच सगळ्या अधिका-यांशी ओळख केल्यामुळे तहसिलदाराने दुकानदाराचं म्हणणं ऐकून घेतलं नाही. मग गावात संतोषविरुद्ध् वातावरण तापवायला सुरुवात केली, पोलीस तक्रार करण्याचे प्रयत्न केले. पण गावातल्या जवळपास सगळ्याच स्त्री-पुरषांनी एकत्र येउन दुकानदाराचा बेत हाणून पाडला आणि त्याच्याच विरोधात उलट तक्रार दाखल केली. त्याला सर्व गावासमोर संतोषची माफी मागायला भाग पाडलं. परिणामी दुकानदार गावातल्या लोकांना पूर्वी 13 रु

47 पैसे ऐवजी 17 रुपयाला रॉकेल देत असे ते आता नियमाप्रमाणे योग्य किंमतीत रॉकेल आणि धान्य देऊ लागला.



संतोषने महिलांना कायदेविषयक माहिती द्यायला सुरुवात केली. गावातली आणि उमरखेडची सगळी महिलामंडळं, पहिल्यांदाचा एकत्र आली. आंतरराष्ट्रीय महिला जागतिक दिनानिमित्त एक दिवसाचा आरोग्य मेळावा घेण्यात आला. डॉ. राणी बंग यांनी महिलांशी संवाद साधला. महिलांनी उघडपणे अनेक मनातल्या शंका मांडल्या. स्तनाच्या कॅन्सरपासून ते रोजची आंघोळ कशी करावी ही माहिती त्यांना राणीताईंकडून मिळाली.

त्यानंतर संतोषने  गावातला दारुचा प्रश्न सोडवण्यावसाठी गावाच्या संमतीने गावात 'दारुबंदी समिती' तयार केली. ठाणेदाराच्या पुढाकाराने गावात दारुबंदी अंमलात आणली. मन्याळी गावात सगळ्यात महत्वाचा सण होळी मानला जातो. होळीत सगळेच स्त्री-पुरुष दारु पितात. मन्याळीच्या इतिहासात

प्रथमच असं घडलं की संतोषच्या प्रयत्नांनी गावात  होळी ही दूध पिऊन साजरी केली गेली. आता गावात चुकून कोणीही दारु घेतली की गावातले लोकच दबाव आणून त्याला त्यापासून परावृत्त करतात. गावातल्या चार ते पाच दारुच्या भटटया अशा रीतीने कायमस्वरुपी बंद झाल्या.

गावातला पाण्याचा प्रश्न संतोषने हाती घेतला. पाण्यासाठी भारत शासकीय योजनेअंतर्गत गावासाठी विहीर मंजूर झाली होती. पण लोकांकडून वेळेत त्या त्या गोष्टींची पूर्तता न झाल्याने ती योजना बारगळली होती. मग संतोषने लोकांना एकत्र केलं आणि श्रमदानातून विहिरीचं काम हाती घेतलं. लोकांच्या श्रमदानातून दिवसा बचतगटाच्या महिला व इतर गाव आणि रात्री हाती काम नसलेला युवा वर्ग होता यांनी मिळून काम करायला सुरुवात केली. दिवस ठरले, लोक कामाला लागले. विहिरीला पाणी लागलं. पंधरा दिवसात गावाची विहीर पूर्ण होईल. यासाठी आणखी काही आर्थिक गरज लागेल. इच्छुक व्यक्ती या कामी संतोषला म्हणजे मन्याळीकरांना सहाय्य करु शकतात.



संतोषच्या अनुभवानं त्याच्यात बदल घडून येताहेत. आपण आता आणखी वाचन केलं पाहिजे असं त्याला वाटतं आहे. आपल्यावरची जबाबदारी वाढतेय हे त्याच्या लक्षात येत आहे. लोकांचा विश्वास अबाधीत राखण्यासाठी जबाबदारीचं महत्वं कळत आहे. संतोषला आता आपलं गाव हिरवंगार करायचं आहे. आपल्या गावातल्या प्रत्येकाच्या हाताला काम असलं पाहिजे असं त्याला वाटतं. शासनाची ‘पर्यावरण संतुलन योजना' त्याला लोकसहभागातून यशस्वी करायची आहे. तालुक्याचे आमदार विजय खडसे यांनी गावविकासात पुढाकार घेण्याचं मनावर घेतलं आहे.

संतोषला त्याच्या गावविकासाच्या कामात आता समविचारी असलेल्या त्याच्या मैत्रिणीची साथ आहेच. पुढे आयुष्यभर जोडीदार म्हणून ती वाटचाल करणार आहे. त्यासाठी लवकरच गावाच्या साक्षीने नोंदणीकृत विवाह करुन संतोष गावाची जुनी रीत मोडून नवी रीत सुरु करु पहातोय. त्याच्या या वाटचालीत त्याचं स्वयंपूर्ण गावाचं स्वप्न साकार करण्याच्या कामी आपल्याला कुठल्याही प्रकारे सहाय्य करण्याची इच्छा असल्यास जरुर संपर्क साधा sgawale05@gmail.com



शब्दांकन - दीपा देशमुख adipaa@gmail.com